# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### मुंबईतील मंत्रालय सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१) २११७२ (०४-०१-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मंत्रालयात जाळयांवर उड्या मारुन आत्महत्येचे प्रयत्न करीत असल्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आत्महत्येच्या घटना रोखण्यासाठी तसेच मंत्रालयाच्या सुरक्षेसाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२४) :** (१) मंत्रालयातील जाळयांवर उड्या मारणे, आत्महत्येचे प्रयत्न करणे आदी घटना घडलेल्या नसून, माहे सप्टेंबर व ऑक्टोबर मध्ये मंत्रालयामध्ये जाळीवर उड्या मारुन आंदोलनाच्या दोन घटना घडलेल्या आहेत.

(२) मंत्रालयातील जाळीवर अशा प्रकारच्या घटना घडू नये यासाठी खालील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत :-

१) मंत्रालय मुख्य इमारतीच्या त्रिमुर्ती प्रांगणाकडील सर्व मजल्यांवर संरक्षक जाळी बसविण्यात आली असून सरकत्या जिन्याजवळील बाजुस संरक्षक जाळी लावण्याचे काम चालू आहे.

२) मंत्रालयात प्रवेश करताना अभ्यागतांमार्फत बॅनर, पोस्टर, पत्रके इ. आक्षेपार्ह वस्तु मंत्रालयात येवू नये याकरीता त्यांची सुरक्षा तपासणी करताना शारीरिक फिस्किंग, डीएफएमडी, एचएचएमडी आणि बॅगेज स्कॅनर मार्फत सखोल तपासणी करण्यात येते.

३) मंत्रालयात येणाऱ्या वाहनांची सखोल तपासणी करण्यात येते.

४) मंत्रालयातील मुख्य इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर गस्तीकरीता अंमलदारांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच नियंत्रण कक्षाकडून प्रत्येक तासाला गस्तीवरील अंमलदारांकडून

वॉकीटॉकीद्वारे सद्य:स्थितीची माहिती घेण्यात येते.

५) मंत्रालयात अभ्यागतांना विनाप्रवेश पास, सुरक्षा तपासणी न करता प्रवेश देण्यात येवू नये याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच मंत्रालयातील संवदेनशील ठिकाणी जेथून आत्महत्येचा प्रयत्न होवू शकतो अशा ठिकाणी विशेष गस्त पथकास निगराणी ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, तसेच दोन्ही इमारतींच्या टेरेसकडे जाणारे सर्व मार्ग बंद करण्यात आलेले आहेत.

६) वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना उपलब्ध मनुष्यबळातून सुरक्षेच्या अनुषंगाने बंदोबस्ताचे योग्य नियोजन करुन सर्व प्रवेशद्वार, मुख्य इमारतीमधील सर्व मजल्यांवर परिपूर्ण बंदोबस्त नियुक्त करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर मध्यवर्ती कारागृहातील कैदी फरार असल्याबाबत

**(२) २१३४४ (१६-०१-२०२४) श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मध्यवर्ती कारागृहातून कोरोना संक्रमण वाढू नये यासाठी ४९३ कैद्यांना सोडण्यात आले असून त्यातील १५ कैदी अद्याप परत आले नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पॅरोल तसेच गंभीर गुन्ह्यातील फरार कैद्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने फरार कैद्यांना शोधण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०२४) :** (१),(२) व (३) हे खरे आहे, जे बंदी विहित कालावधीत कोरोना आकस्मिक रजेवरुन कारागृहात आले नाहीत, त्यांच्यावर नागपूर मध्यवर्ती कारागृहामार्फत भा.दं.वि. कलम २२४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर बंद्याचा शोध घेऊन त्यांना कारागृहात दाखल करणेसाठी प्रत्येक महिन्यांत फरार बंद्याची माहिती पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर व पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर व इतर संबंधित विभागांना नागपूर मध्यवर्ती कारागृहामार्फत देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी शासकीय आश्रम शाळेतील विविध रिक्त पदे भरण्याबाबत

**(३) २१४९२ (०३-०१-२०२४) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १९३४८ ला दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठींच्या ४९७ शासकीय आश्रमशाळांकरीता १६,४४३ पदे मंजूर असताना यापैकी ९५५३ पदे (५९%) भरली गेली असून ६६९० पदे (४१%) रिक्त असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी शासकीय आश्रमशाळातील नाशिक विभागातील ४२.४६%, ठाणे विभागातील ३७.१९%, अमरावती विभागातील ४०% व नागपूर विभागातील ४१.८८% पदे रिक्त असल्यामुळे आदिवासी आश्रम शाळातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा दर्जा खालावला असून गुणवत्तापूर्ण शिक्षण व समग्र विकास करणाऱ्या वातावरणापासून आदिवासी व दुर्गम भागातील विद्यार्थी वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या तसेच अनुदानित आश्रम शाळांमधील आदिवासी बालकांच्या मृत्यूसाठी रिक्त पदे महत्त्वाचे कारण असून जे कर्मचारी सध्या आश्रम शाळेमध्ये शिक्षक व कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत तेच त्याच आश्रमशाळांसाठी काम करतात का याची तातडीने चौकशी होण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर शाळांचे दोन वर्षातून एकदा मुल्यमापन करण्याबाबत तसेच रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०१-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत एकूण ४९९ शासकीय आश्रमशाळा व एकूण २ आदर्श आश्रमशाळा कार्यान्वित आहे.

आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाचा दिनांक १६/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारीत आकृतिबंध मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार, शासकीय आदिवासी व आदर्श आश्रमशाळेचा एकूण १०४४३ पदांचा सुधारित आकृतिबंध मंजूर आहे. सदर सुधारित आकृतीबंधानुसार एकूण ७२५२ पदे भरलेली आहे व एकूण ३१९१ पदे रिक्त आहे म्हणजेच एकूण भरलेल्या पदांची टक्केवारी ६९.४४३ इतकी आहे व एकूण रिक्त पदांची टक्केवारी ३०.५५६ इतकी आहे.
(२) हे खरे नाही.

आदिवासी शासकीय आश्रमशाळेतील नाशिक विभागात ३१.८६ %, ठाणे विभागात ३०.५१ %, अमरावती विभागात २६.४४ % व नागपूर विभागात ३१.९१ % इतकी पदे रिक्त आहे.

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेमार्फत दिनांक २३/११/२०२३ रोजी पेसा क्षेत्रातील पदे वगळून एकूण ६०२ पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून, सदर पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.

विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून ज्या शासकीय आश्रमशाळेवर शिक्षकांची रिक्त पदे आहे, त्या शासकीय आश्रमशाळेवर तासिका तत्वावरील उमेदवारांची नियुक्ती केली जाते.
(३) व (४) हे खरे नाही.

अनुदानित आश्रमशाळामधील शिक्षक व कर्मचारी हे त्याच आश्रमशाळासाठी काम करतात. सदर अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांची इतरत्र ठिकाणी बदली करता येत नाही.

आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दिनांक २०/०९/२०२२ अन्वये राज्यातील आदिवासी

विकास विभागाच्या अधिनस्त अनुदानित आश्रमशाळा यांचे मुल्यमापन करण्यासाठी संबंधित उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समितीचे गठण करण्यात आलेले आहे.

अनुदानित आश्रमशाळेतील रिक्त पदे संबंधित स्वयंसेवी संस्थेमार्फत संबंधित प्रकल्प अधिकारी/संबंधित अपर आयुक्त यांचेमार्फत भरली जातात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## केंद्र शासनाने प्रकाशित केलेल्या यादीतील “छत्री” अनुसूचित जमाती ही अनुसूचित जमात नसल्याचे जाहीर केल्याबाबत

**(४) २१५०६ (०४-०१-२०२४) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती-जमातीची प्रमाणपत्रे देतेवेळी सक्षम अधिकाऱ्यांनी घ्यावयाची दक्षता याबाबत दिनांक २४ एप्रिल, १९८५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयांतर्गत पान क्र. २६ वरील रकाना क्र.७ मध्ये मध्ये “छत्री” अशी अनुसूचित जमात नाही असे नमूद केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस.सी.एस.टी. अमेंडमेंट ॲक्ट १९७९ अंतर्गत भारत सरकार तर्फे हिंदी भाषेत प्रकाशित करण्यात आलेल्या अनुसुचित जाती जमातींच्या यादीत द्वितिय अनुसूची अंतर्गत भाग ९ मध्ये महाराष्ट्राच्या यादीत अनुक्रमांक २२ वर “छत्री” ही अनुसूचित जमाती असल्याचे नमूद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जाती-जमातीच्या नावात बदल करणे, नवीन नांव यादीत टाकणे, यादीतील नांव वगळणे हे संपूर्ण अधिकार केवळ केंद्र शासनास असतानाही संविधानाविरूध्द आणि केंद्र शासनाच्या अधिनियमाविरूध्द शासन निर्णय निर्गमित करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०५-०६-२०२४) :** (१) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र देते वेळी सक्षम प्राधिकाऱ्याने घ्यावयाची दक्षता याबाबत दिनांक २४/०४/१९८५ च्या शासन निर्णयान्वये मागदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रातील पृष्ठ क्र. २८ वर अनुक्रमांक १७ अंतर्गत रकाना ७ मध्ये “छत्री” अशी अनुसूचित जमात नाही असे नमूद केले आहे.

(२) अनुसूचित जाती व जनजाती आदेश (सुधारणा) अधिनियम १९७६ हे राजपत्र इंग्रजी,हिंदी व मराठी भाषेमध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे नोंद आहे.

१. सदर राजपत्र हे इंग्रजी मध्ये दिनांक २०/०९/१९७६ मध्ये प्रसिध्द करण्यात आले असून अनुक्रमांक २२ वर “Kawar, Kanwar, Kaur, Cherwa, Rathia, Tanwar, Chattri” अशी नोंद आहे.

२. सदर राजपत्र हे हिंदी भाषेमध्ये दिनांक २९/११/१९७९ मध्ये प्रसिध्द करण्यात आले असून अनुक्रमांक २२ वर “कवर, कंवर, कौर, चेरवा, राठिया, तनवर, छत्री” अशी नोंद आहे.

३. सदर राजपत्र हे मराठी भाषेमध्ये दिनांक ९/०७/१९९० मध्ये प्रसिध्द करण्यात आले असून अनुक्रमांक २२ वर “कंवर, कावर, कोर, चेरवा, राठिया, तन्वर, छट्री” अशी नोंद आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## कंत्राटी कामगारांच्या विम्याच्या रकमेतून १ टक्के विमा कपात करण्यात येत असल्याबाबत

**(५) २१५२६ (०४-०१-२०२४) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. संकिर्ण - २०१८/प्र.क्र. ४७ /विमा प्रशासन दिनांक १३ जुलै, २०२२ मध्ये शासकीय/निमशासकीय विभाग/महामंडळे/सार्वजनिक उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मार्फत देण्यात येणाऱ्या कामांचा व त्याकरीता नियुक्त कामगारांचा विमा उतरविण्याबाबत कार्यपध्दतीबाबतचा शासन निर्णय प्रसिध्द करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त शासन परिपत्रकामधील आदेश क्र. ब मधील अ प्रमाणे कपात न करता त्या ऐवजी नगरपरिषद, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग हिंगोली व परभणी मध्ये पंचवीस लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या कामामध्ये ०.५ टक्के ची विमा कपात न करता १ टक्के विमा कपात करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त कंत्राटी कामांमध्ये दिनांक १३ जुलै, २०२२ रोजीच्या शासन परिपत्रकातील अटी व शर्ती डावलुन स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग हे ०.५ टक्के ची विमा कपात न करता १ टक्के विमा कपात करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२३-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

जिल्हा परिषद परभणी यांचे कडून शासन परिपत्रकामधील आदेश क्र. ब मधील अ प्रमाणे २५.०० लक्ष पेक्षा कमी असलेल्या कामांमध्ये ०.५ टक्के विमा कपात करण्यात येते.

जिल्हा परिषद हिंगोली यांचेकडून देखील शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येते. तथापि, ज्या कंत्राटदारांकडून कंत्राटी कामांचा विमा उतरविण्यात आलेला नाही, त्यांचे देयकामधून सन २०२३-२४ दरसूचीमधील मार्गदर्शक सुचनेनुसार कंत्राटदाराला दंड आकारण्यात यावा असे नमूद असल्याने १% विमा कपात करुन विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडे भरणा करण्यात येतो.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील दुर्गम भागातील गावे पक्के रस्ते व मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(६) २१६७२ (०३-०१-२०२४) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील दुर्गम भागातील १६ गावे आजही पक्के रस्ते, मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असल्याचे व सदर गावांमध्ये आरोग्य सेविकांना व नागरिकांना जाण्याकरीता दीड ते दोन किलोमीटरचा पायी प्रवास तसेच नदी, नाला ओलांडून जावे लागत असल्याचे दिनांक २७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, उक्त गावांमध्ये रस्ते व मूलभूत सोयी-सूविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०३-०६-२०२४) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

आदिवासी विकास विभागांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये उपलब्ध निधीनुसार रस्ते/पुल यांची कामे राज्यस्तरावरुन मंजूर करण्यात येतात. तसेच, जिल्हा वार्षिक घटक कार्यक्रमांतर्गत गावे/पाडे जोडण्यासाठी रस्त्यांना निधी उपलब्ध करुन दिला जातो.

जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना तसेच, वार्षिक सर्वसाधारण योजनेंतर्गत पाणी, आरोग्य, वीज आणि शिक्षण या पायाभूत सुविधांकरीता प्राध्यान्य क्रमाने निधी उपलब्ध करुन देऊन संबंधित यंत्रणेमार्फत कामे करुन घेतली जातात.

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील मुख्य रस्त्याशी न जोडलेली वाडे/पाडे बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी शासन निर्णय दिनांक १३/०९/२०२३ अन्वये "भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना" सुरु करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पीव्हीसी पाईपकरीता केंद्र व राज्य शासनाकडून देण्यात येत असलेल्या अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याबाबत

**(७) २१७१३ (३१-१२-२०२३) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत महा.डी.बी.टी. पोर्टलद्वारे विविध घटकांचा लाभ देण्यात येतो, यामध्ये शेतकऱ्यांनी मागणी केलेले घटक / बाबी शेतकऱ्यांना उपलब्ध होत असल्याने शेतकऱ्यांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा होतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान कडधान्य कृती आराखडामधील सिंचन साधने व सुविधा या उपघटकांतर्गत पाण्याच्या स्त्रोतापासून शेतीपर्यंत पाणी वाहून नेण्यासाठी ३५ रूपये प्रति मीटर या प्रमाणे रूपये १५,०००/- प्रति लाभार्थी या मर्यादेत अनुदान देण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अनुदानाची रक्कम तसेच सदर योजनेतील भौतिक लक्ष्यांक हा राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या शेतकरी संख्येच्या तुलनेत कमी असल्याची बाब सन २०२३-२४ मधील अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार दिसून येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पाण्याच्या स्त्रोतापासून शेतीपर्यंत पाणी वाहून नेण्यासाठी पाईप या योजनेंतर्गत पीव्हीसी पाईपकरीता केंद्र व राज्य शासनाकडून देण्यात येत असलेल्या अनुदानाच्या रकमेत व भौतिक लक्ष्यांकात भरीव वाढ करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे माहे ऑगस्ट-

सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास त्यानुषंगाने या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत,
(६) तसेच या प्रकरणी अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याबाबत शासनाची नेमकी भुमिका काय असून शासन या प्रकरणी सकारात्मक असल्यास याबाबतची कार्यवाही किती कालावधीत करण्यात येणार आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१२-०३-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३), (४), (५) व (६) होय, हे खरे आहे,, राष्ट्रीय अन्न आणि पोषण सुरक्षा अन्नधान्य पिके ही योजना केंद्र पुरस्कृत असून केंद्राने सन २०१८-१९ मध्ये मंजूर केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार योजनेची अंमलबजावणी केली जाते.
सदर योजनेंतर्गत सिंचन साधने व सुविधा या घटकांतर्गत पीव्हीसी पाईपच्या अनुदान दराच्या मापदंडामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे हजारो तक्रारी प्रलंबित असल्याबाबत

**(८) २१७५३ (०९-०१-२०२४) श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १९०५१ ला दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध गृहनिर्माण प्रकल्पांच्या नोंदणीपासून ते हस्तांतरणपर्यंत गृह खरेदीदारांची गैरव्यवहार टाळण्यासाठी दिनांक १ मे, २०१७ रोजी शासनाने महाराष्ट्र स्थावर संपदा नियमक प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून विविध सुरू असलेले तसेच प्रस्तावित गृहनिर्माण प्रकल्पांची नोंद घेत महारेराने नियमावलीच्या माध्यमातून महारेरा कायद्याची अंमलबजावणी सुरू केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१७ पासून आजतागायात महाराष्ट्र व दिव दमण केंद्रशासित प्रदेशातून एकूण २२,९६६ तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी १५,३५० तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत उर्वरित ७ हजारांहून अधिक तक्रारी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू ७ हजाराहून अधिक प्रलंबित असलेल्या तक्रारी निकालात काढून गृह खरेदीदारांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (३०-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) दिनांक १५/०१/२०२४ पर्यंत २३०७६ तक्रारी दाखल झाल्या असून, त्यापैकी १५३३२ तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. उर्वरित तक्रारीवर सुनावणीची प्रक्रीया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात जळगाव जिल्ह्यातील आदिवासी कोळी लोकांच्या विविध मागण्यां पूर्ण करण्याबाबत

**(९) २१७९८ (०३-०१-२०२४) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जळगाव जिल्ह्यात आदिवासी कोळी लोकांना अनुसूचित जमातीच्या दाखल्यासाठी व विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा दरम्यान निदर्शनास आली, आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी कोळी लोकांना अनुसूचित जमातीचे दाखले व वैधता प्रमाणपत्र तातडीने वितरित करणे, महर्षी वाल्मीकी महामंडळ स्थापन करण्याची मागणी या प्रमुख मागण्यांसह निवेदनात केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०५-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) आदिवासी कोळी लोकांना अनुसूचित जमातीचे दाखले व वैधता प्रमाणपत्र तातडीने वितरित करणे, महर्षी वाल्मीक महामंडळ स्थापन करण्याची मागणी या प्रमुख मागण्यासह निवेदनात केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०/१०/२०२३ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार आवश्यक कार्यवाही करण्यातबाबत सर्व संबंधित विभागांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील केळी पीक लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी जाचक अटी शिथिल करणेबाबत

**(१०) २१८५२ (०३-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केळी पीक लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी रोजगार हमी योजना केळी पिकाला लागू करण्यात आली आहे, परंतु योजनेतील जाचक अटीमुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांनी सदर योजनेस नगण्य प्रतिसाद दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेतील जाचक अटी शिथिल करून शेतकऱ्यांचा सहभाग वाढविणे यासाठी शासनाकडून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०६-०६-२०२४) :** (१) विभागाच्या दिनांक ३०/०३/२०२२ च्या शासन निर्णयान्वये केळी पिकाचा मनरेगा अंतर्गत समावेश करण्यात आलेला आहे. सदर योजनेमध्ये केळी (३ वर्ष) या पिकाचा समावेश असल्यामुळे, मजुरी सामुग्रीवर होणारा खर्च कमी होवून लाभार्थी शेतकऱ्यांना

दिलासा मिळत असून, राज्यामध्ये केळी लागवडीच्या क्षेत्रामध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे.
(२) मनरेगा योजना केंद्र पुरस्कृत आहे. मनरेगा योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने राबविण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे गोद्री (ता.जामनेर) येथे आयोजित केलेल्या अखिल भारतीय हिंदू गोर बंजारा व लाबना नायकडा समाज कुंभ २०२३ कार्यक्रमाबाबत

**(११) २१८६३ (०३-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १९२६६ ला दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे गोद्री (ता.जामनेर) येथे दिनांक २५ ते ३० जानेवारी, २०२३ या कालावधीत अखिल भारतीय हिंदू गोर बंजारा व लाबना नायकडा समाज कुंभ २०२३ आयोजित करण्यात आला होता, सदर कार्यक्रम नियोजन व खर्च संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे दिनांक २७ ऑगस्ट, २०२३ रोजी निवेदन केलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे
(२) मौजे गोद्री (ता.जामनेर) येथे अखिल भारतीय हिंदू गोर बंजारा व लाबना नायकडा समाज कुंभ २०२३ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.सदर कार्यक्रम आयोजनास मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांच्याकडून रुपये ८८,५०,०००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.सदर प्रस्तावास दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आर्थर रोड कारागृहाचे प्रतिक्षालय बेघरांचे निवासस्थान झाल्याबाबत

**(१२) २१९१२ (०९-०१-२०२४) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिंचपोकळी येथील ब्रिटिशकालीन मध्यवर्ती कारागृह आर्थर रोड येथील कैद्यांचे नातेवाईक आणि मित्रमंडळी प्रतिक्षालयामध्ये भेटण्यासाठी येतात, तथापि नातेवाईकांसाठी असणारे सदर प्रतिक्षालय हे बेघर गर्दुल्ले यांचे आश्रय स्थान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कारागृहातून कैद्यांना कोर्टात घेऊन गेल्यानंतर दुपारनंतर या प्रतिक्षालयामध्ये कोणी नसते, येथील बेघर गर्दुल्ले या प्रतिक्षालयाचा वापर करीत आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेघर गर्दुल्ले यांचा बंदोबस्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०२४) :** (१),(२),(३) मुंबई मध्यवर्ती कारागृहाच्या समोरील भागामध्ये बंद्यांच्या नातेवाईकांना बसण्यासाठी प्रतीक्षालय बांधण्यात आलले आहे. सदर प्रतीक्षालयामध्ये काही गर्दुल्ले इसम राहत असल्याचे निदर्शनास आले असल्याने सदर इसमांवर कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत ऑर्थर रोड मध्यवर्ती कारागृहाने ना.म.जोशी मार्ग पोलीस स्टेशन व आग्रीपाडा पोलीस स्टेशन यांच्याकडे तक्रार दाखल केलेली आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत प्रतीक्षालयामध्ये बेघर व्यक्ती निवास करीत असल्याचे दिसून आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील धारावी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत नागरिकांची फसवणूक होत असल्याबाबत

**(१३) २१९६५ (०४-०१-२०२४) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील धारावी पुनर्वसन प्रकल्पासंदर्भात धारावीतील नागरिकांची फसवणूक होत असल्याने विविध राजकिय पक्षांनी व संघटनांनी बांद्रा येथील म्हाडाच्या कार्यालयावर मोर्चा काढला असल्याची बाब दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने मोर्चेकरांच्या मागण्यांच्या अनुषंगाने धारावी पुनर्वसन प्रकल्पासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०३-०६-२०२४) :** (१) विविध राजकीय पक्षांनी व संघटनांनी मोर्चा काढला, होय, हे खरे आहे.
(२) धारावी पुनर्विकास समिती अंतर्गत सर्व पक्षीय व सर्व जनसंघटनांचे धारावी बचाव आंदोलन या समितीचे दिनांक १२/१०/२०२३ रोजीचे निवेदन या विभागास प्राप्त झाले असून, सदर निवेदनात नमूद केलेल्या मुद्द्याच्या अनुषंगाने बैठक घेण्याची विनंती केली आहे. त्यानुसार मा.मुख्यमंत्री महोदयांची बैठकीसाठी वेळ मिळण्याकरीता नस्ती सादर करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरूळ लेणीत हायड्रोलिक लिफ्ट बसविण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(१४) २२०११ (०४-०१-२०२४) प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जागतिक वारसा लाभलेल्या वेरूळ लेणीत हायड्रोलिक लिफ्ट बसविण्याचा प्रस्ताव अद्याप प्रलंबित असल्याने या ठिकाणी जगातील विविध पर्यटक येत असून यातील जेष्ठ नागरिक, दिव्यांग, अपंग नागरिक, पर्यटकांना पायऱ्या चढून वर जावे लागत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वेरूळ लेणीत हायड्रोलिक लिफ्ट तातडीने बसवून पर्यटकांना दिलासा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०२४) :** (१) व (२) प्रश्नाधीन स्मारक केंद्र संरक्षित स्मारक असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, छत्रपती संभाजीनगर मंडळ यांच्या अखत्यारीत आहे. या स्मारकाच्या ठिकाणी हायड्रोलिक लिफ्ट बसविण्याचा कोणताही प्रस्ताव भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळाच्या विचाराधीन नाही. तथापि, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळामार्फत स्मारकाच्या ठिकाणी ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग पर्यटकांना व्हील चेअर व रॅम्पची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्ह्यातील जळगाव जामोद (जि.बुलढाणा) येथील नुकसानग्रस्त नागरिकांच्या सानुग्रह अनुदानाच्या मागणीबाबत

**(१५) २२०१५ (०४-०१-२०२४) प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद येथे पुराचे पाणी घरात शिरून मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या नागरिकांनी सानुग्रह अनुदानाच्या मागणीसाठी तहसिल कार्यालयावर सामुहिक उपोषण केले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उपोषणकर्त्यांनी केलेल्या मागणीनुसार सानुग्रह अनुदान देण्यासाठी व इतर मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील (२४-०४-२०२४) :** (१) होय हे खरे आहे.
(२) जळगांव जामोद येथे नैसर्गिक आपत्तीत पात्र नुकसान धारकांना सानुग्रह अनुदान वाटपाचे काम पूर्ण झालेले असून एकूण ७७७२ लाभार्थी यांना एकूण ७७७२००००/- (अक्षरी-सात कोटी सत्याहत्तर लाख वीस हजार रुपये फक्त) एवढे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. तसेच शेतीपिकाच्या २८७८४ लाभार्थ्यांपैकी २३२१३ शेतकऱ्यांना मदत वाटप करण्यात आलेली असून उर्वरित लाभार्थी यांना मदत वाटपाचे काम ऑनलाईन पध्दतीने सुरु आहे. तसेच ५९ पशुमालकांना ६४ जनावरांचे एकूण २०७६५००/- (अक्षरी- वीस लाख श्याहत्तर हजार पाचशे रुपये फक्त) एवढे अनुदान वाटप करण्यात आलेले आहे.

तसेच निवेदनातील इतर मागण्यांबाबत कार्यवाही करीता संबंधित विभागांना कळविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महारेरा प्राधिकरणाने प्रकल्पांची नोंदणी स्थगित केलेल्या ग्राहकांना दिलासा देण्याबाबत

**(१६) २२१०४ (०९-०१-२०२४) अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महारेरा प्राधिकरणाने माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान नोंदविलेल्या ७४६ प्रकल्पांपैकी ३८८ प्रकल्पांची नोंदणी स्थगित करतानाच बॅंक खातीही गोठविण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित प्रकल्पातील विकासकांना जाहिरात व विक्री करण्यास बंदी घालण्यात आली असून माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत नोंदणी झालेल्या ५ हजार गृहप्रकल्पांना नोटीसा बजाविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पांमध्ये घरे घेणाऱ्या ग्राहकांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (३०-०५-२०२४) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

महारेरा प्राधिकरणाने जानेवारी, २०२३ मध्ये ७४६ प्रकल्पांपैकी ३६३ प्रकल्पांची नोंदणी स्थगित ठेवण्यात आली आहे. ३६३ प्रकल्पांपैकी १६५ प्रकल्पांनी दंड भरुन कागदपत्राची पुर्तता केली असल्याने त्यांचेवरील कारवाई मागे घेण्यात आली असून, उर्वरित १९८ प्रकल्पांच्या नोंदणी स्थगित ठेवल्या असून, त्यांची बॅंक खाती गोठवण्यात आली आहेत. सदर प्रकल्पातील सदनिकांची खरेदी-विक्री वर बंदी असल्याबाबत संबंधित सह निबंधकांना तसेच सदर प्रकल्पांची जाहिरात व विक्री न करण्याबाबत संबंधित विकासकांना कळविण्यात आले आहे.

मे, २०१७ ते मार्च, २०२२ या कालावधीत १९४५१ प्रकल्पांनी मुख्यत: फॉर्म ५ वेळोवेळी त्यांच्या प्रकल्पामधील वेबपेजवर अपलोड न केल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीसेस बजावण्यात आल्या आहेत.
(३) जानेवारी, २०२३ मध्ये ३६३ नोंदणी झालेल्या प्रकल्पांवर स्थगिती ठेवण्यात आल्यानंतर या प्रकल्पांची यादी व आदेश महारेराच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. जेणेकरुन घरे घेणाऱ्या ग्राहकांना या प्रकल्पांबद्दल इत्यंभूत माहिती मिळेल व त्यानुसार सदर प्रकल्पांमध्ये सदनिका खरेदीबाबत योग्य तो निर्णय घेऊ शकेल.
(४) प्रश्न उद्भतव नाही.

---

## सोलापूर राज्यातील इतर जिल्हयात दुष्काळ जाहीर करुन सवलती देण्याबाबत

**(१७) २२२२९ (०३-०१-२०२४) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४३ तालुक्यांमध्ये सरासरी पेक्षा कमी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले असून दुष्काळाचा ट्रिगर-टु लागु करण्यात आला आहे यात सोलापुर जिल्ह्यातील ५ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुष्काळाचा ट्रिगर-टु लागु करण्यासाठी कोणते निकष लागु करण्यात आले आहे, ट्रिगर-टु लागु झालेल्या तालुक्यात लवकरात लवकर दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना सवलती देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अनिल पाटील (११-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७, दिनांक ३१/१०/२०२३ अन्वये ट्रिगर-टु लागू करण्यात आलेल्या सोलापूर जिल्ह्यातील ३ तालुक्यात गंभीर स्वरूपाचा तसेच २ तालुक्यात मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.
(२) दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मुल्यांकन करण्याबाबत महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१७/ प्र.क्र.१७३/ २०१७/म-७, दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ व दिनांक २८ जून, २०१८ अन्वये विहीत करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार १५ जिल्ह्यातील २४ तालुक्यात गंभीर स्वरूपाचा व १६ तालुक्यांमध्ये मध्यम स्वरूपाचा दुष्काळ घोषित करण्यात आला असून खालील सवलती लागू करण्यात आल्या आहेत.
१) जमीन महसूलात सूट.
२) पीक कर्जाचे पुनर्गठन.
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती.
४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५% सूट.
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी.
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता.
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर.
८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र सुरक्षा बलाचे बळकटीकरण करणेबाबत

**(१८) २२४१० (०४-०१-२०२४) श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक २०५०८ ला दिनांक २४ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ घटीत महाराष्ट्र सुरक्षा बलातील सुरक्षा जवान हे ११ वर्षे झाली तरी कंत्राटी पध्दतीवर आणि तुटपुंज्या वेतनावर काम करत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे सुरक्षा जवान तुटपुंज्या पगारावर कार्यरत असून, सेवेत कायम नाहीत, अन्यायकारक बदल्या, अधिनियमाला डावलून युनिफॉर्म व ओळखपत्रामध्ये बदल, आरोग्य विमा नाही, प्रशिक्षणाची कमतरता इत्यादी समस्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत राज्य शासन सुरक्षा बदलातील जवानांच्या समस्या सोडविण्यासाठी सुरक्षा कर्मींच्या वेतनात वाढ करण्बाबतचा प्रस्ताव संचालक मंडळाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त महाराष्ट्र सुरक्षा बलातील सुरक्षा जवानांच्या वेतनात वाढ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०२४) :** (१) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे अधिनियम,२०१० मधील कलम ०६ नुसार सुरक्षा जवान यांची नेमणुक कंत्राटी पध्दतीवर केली जाते..
(२) हे खरे नाही. - सदरबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.
वेतन (पगार) - सुरक्षा रक्षकांचे वेतन आस्थापनांकडून मिळणाऱ्या सुरक्षा शुल्कानुसार निश्चित केले जाते. सुरक्षा शुल्क ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास आहेत. संचालक मंडळाने दिनांक २७/०७/२०२३ रोजी सुरक्षा शुल्क वाढीचा निर्णय घेतला असून दिनांक ०१/१२/२०२३ पासून नवीन दराने सुरक्षा शुल्क आकारणी केली जाते व त्यानुसार सुरक्षा रक्षकांनाही वेतनवाढ देण्यात आली आहे.
बदल्या - सुरक्षा कर्मी यांच्या बदल्या संदर्भात सुस्पष्ट नियमावली केली असून त्यानुसार बदल्या केल्या जातात. गणवेष आणि ओळखपत्र - सद्य:स्थितीत सुरक्षा कर्मी यांचा गणवेष Elite forces धर्तीवर polyester Viscos - Bottle Camouflage या स्वरूपाचा आहे. तर ओळखपत्र यावर उमेदवाराचे नाव, त्याचे पद, महामंडळाचा लोगो आणि सुरक्षा कर्मीचे ओळखपत्र क्रमांक इ. बाबी स्पष्ट नमुद असून त्याव्दारे सुरक्षा कर्मी महामंडळाचे सुरक्षा रक्षक असल्याचे स्पष्ट होते. सुरक्षा कर्मीचा सध्याचा गणवेष संचालक मंडळाच्या दिनांक २७/०७/२०२३ रोजीच्या बैठकीत मान्य करण्यात आलेला आहे. सुरक्षा कर्मीचा युनिफॉर्म व ओळखपत्र यामधील बदल अधिनियमातील तरतुदी व त्याप्रमाणे व्यवस्थापकीय संचालक आणि संचालक मंडळास प्राप्त अधिकारान्वयेच करण्यात आलेले आहेत.
आरोग्य विमा -महामंडळाने Axis Bank सोबत करार केला असून त्यानुसार सुरक्षा कर्मी यांची बैंक खाती Axis Bank मध्ये उघडण्यात आली आहेत. त्याबदल्यात Axis Bank कडून नैसर्गिक मृत्यू प्रकरणी रुपये ५ लाख आणि अपघात मृत्यू प्रकरणी रुपये ४५ लाख इतका विमा (कोणताही प्रिमियम न भरता) सुविधा सुरक्षा कर्मीना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
प्रशिक्षण - सुरक्षा कर्मीना भरतीनंतर राज्य पोलीस दल आणि राज्य राखीव पोलीस दल यांच्या प्रशिक्षण केंद्रामधून मूलभूत व आवश्यक प्रशिक्षण दिले जाते.
(३) व (४) सुरक्षा कर्मीच्या वेतनात वाढ करण्यासाठी आस्थापनांकडून घेण्यात यावयाचे सुरक्षा शुल्क यामध्ये वाढ करण्याबाबत संचालक मंडळाने दिनांक २७/०७/२०२३ रोजी सुरक्षा शुल्क वाढीचा निर्णय घेतला असून दिनांक ०१/१२/२०२३ पासून नवीन दराने सुरक्षा शुल्क आकारणी केली जाते व त्यानुसार सुरक्षा रक्षकांनाही वेतनवाढ देण्यात आली आहे. सदर निर्णयाव्दारे सुरक्षा शुल्कामध्ये प्रतिमहिना रुपये

५०००/- वाढ करण्यात आली आहे व त्यानुसार वेतनात देखील वाढ करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गृहनिर्माण प्रकल्पांची माहिती संकेतस्थळावर नोंदणी करण्याबाबत

**(१९) २२५३४ (०५-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गृहनिर्माण प्रकल्पांपैकी जे प्रकल्प १० नोव्हेंबर पर्यंत दंडात्मक रक्कम भरून कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करणार नाहीत त्यांची नोंदणी आता रद्द होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गृहनिर्माण प्रकल्पांबाबत अधिकची माहिती संकेतस्थळावर नोंदविण्यात आली नसल्यामुळे सुमारे शेकडो प्रकल्पांची नोंदणी महारेराने स्थगित केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने गृहनिर्माण प्रकल्पांची माहिती संकेतस्थळावर नोंदविण्यांबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (३०-०५-२०२४) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
जानेवारी, २०२३ ते मार्च, २०२३ पर्यंत १८८९ प्रकल्पांची नोंदणी झालेली असून, त्यापैकी ७४१ प्रकल्पातील विकासकांनी अनिवार्य त्रैमासिक विवरणपत्रे विहित मुदतीत त्यांच्या वेब पेजवर अपलोड न केल्यामुळे सदर प्रकल्पांना महारेरा तर्फे तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती. ७४१ प्रकल्पातील विकासकांपैकी २४३ प्रकल्पातील विकासकांनी अनिवार्य त्रैमासिक विवरणपत्रे व दंड भरलेला असल्याने उर्वरित ४९८ प्रकल्पातील विकासकांच्या प्रकल्पांना तात्पुरती स्थगिती देण्यात आलेली आहे.
ज्या गृहनिर्माण प्रकल्पांनी महारेराच्या नोटीसेसच्या अनुषंगाने आवश्यक तो दंड भरला नाही व विवरणपत्रे अपलोड केलेली नाहीत अशा गृहनिर्माण प्रकल्पांवर गुणवत्तेनुसार महारेरातर्फे अंतिम निर्णय घेण्यात येत आहे.
(३) महारेरा कलम ११ व नियम ३, ४ व ५ अंतर्गत प्रवर्तकांनी नोंदणीकृत प्रकल्पांचे त्रैमासिक/वार्षिक विवरणपत्रे अपलोड करणे अनिवार्य आहे. विवरणपत्रे जाहीर केल्यामुळे गृहप्रकल्पात खरेदी केलेले ग्राहक किंवा इच्छूक ग्राहकांना प्रकल्पांची सद्य:स्थिती कळते. तथापि, ज्या प्रवर्तकांनी विवरणपत्रे भरलेली नाहीत, त्यांच्या विरुध्द कारवाई करुन त्यांच्या प्रकल्पांची नोंदणी स्थगित करण्यात येते. तसेच अशा प्रकल्पांना स्थगिती दिनांकापासून सदर सदनिका विक्री करण्यास बंदी घालून, त्यांचे बँक खाते गोठविण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर)तालुक्यातील आदिवासी वन हक्क जमिनीचे प्रलंबित दावे मंजूर करण्याबाबत

**(२०) २२६१३ (०३-०१-२०२४) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील सन २००६ पासून अस्तित्वात आलेल्या वन हक्क कायद्यांतर्गत शेकडो वन हक्क जमिनीची प्रकरणे अद्यापही वन विभागाकडे प्रलंबित असल्याने सदर दावे मंजूर करावेत यासाठी आदिवासी श्रमजीवी संघटनेने मांडवी वन क्षेत्रपाल कार्यालयावर दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजी मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वन हक्क कायद्यांतर्गतच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (१६-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) मांडवी वनक्षेत्रात माहे सप्टेंबर, २०२१ पासून एकूण १४२७ वैयक्तिक वन हक्कदाव्यांची पुर्तता करुन संबंधित प्रभाग समिती, वसई विरार महानगरपालिका व उपविभागीय अधिकारी, वसई यांच्याकडे पाठविण्यात आले आहेत. तसेच मांडवी वनक्षेत्र कार्यालयात नव्याने प्राप्त होणाऱ्या वैयक्तिक वन हक्क दाव्यांबाबत वनपाल/वनक्षेत्रपाल यांच्याकडून वेळोवेळी पुर्तता करुन प्रभाग समिती, वसई-विरार शहर महानगरपालिका व उप विभागीय अधिकारी, वसई यांच्याकडे पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.